कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१११६/(३९४/२०१६)/आ.(वर्ग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १४ मार्च, २०१८.

<u>शासन आदेश :-</u>

जलसंपदा विभागातील पुढील उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर रुपये १५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००) या वेतनश्रेणीत प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ **<u>तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात</u>** पदोन्नती देण्यात येत आहे.

१. श्री.गणेश भगवानराव भगत (खुला) (ज्ये.क्र.२३)
२. श्री.जितेंद्र मुकूंदराव पाटील (इ.मा.व.) (ज्ये.क्र.२४)
३. श्री.रईस जहाँगीर मोमीन (खुला) (ज्ये.क्र.२५)
४. श्री.अंकुश काशिनाथराव जाधव (खुला) (ज्ये.क्र.२६)

२. वर नमूद अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून तदर्थ / तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे :-

१) सदर तदर्थ पदोन्नती ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील.

२) वरील अधिकाऱ्यांची पदोन्नती ही उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गाच्या अंतिम ज्येष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून ज्येष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

३) त्यांना देण्यात आलेली ही पदोन्नती कोणतीही पूर्वसूचना वा नोटीस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

३. पदोन्नत झालेल्या वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीने नियुक्ती सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोईच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
१	२	३	४	५
१.	श्री.गणेश भगवानराव भगत	उप अभियंता, द्वार निर्मिती व उभारणी उपविभाग क्र.२, अकोला.	कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग, कोल्हापूर.	रिक्त पदी.
२.	श्री.जितेंद्र मुकूंदराव पाटील	उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम (यांत्रिकी) उप विभाग, धुळे.	उप अधीक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, नाशिक.	रिक्त पदी.
३.	श्री.रईस जहाँगीर मोमीन	उप अभियंता, गुणनियंत्रण व तपासणी उपविभाग क्र.१, दापोडी, पुणे.	कार्यकारी अभियंता, ताकारी यांत्रिकी व विद्युत विभाग, सांगली.	रिक्त पदी.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	सध्या धारण करीत असलेले पद	पदोन्नतीने नियुक्तीचे पद	अभिप्राय
४.	श्री.अंकुश काशिनाथराव जाधव	उप अभियंता, मुख्य द्वार उभारणी पथक क्र.४, औरंगाबाद.	कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन यांत्रिकी व विद्युत पथक ओगलेवाडी, ता.कराड जि.सातारा.	रिक्त पदी.

४. सदर अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूल विभाग वाटप नियम, २०१५ नुसार महसूली विभागाचे वाटप करण्यात आलेले आहे.

५. सदर अधिकाऱ्यांची पदोन्नती ५०/५५ च्या वर्षाच्या पुनर्विलोकनाच्या निर्णयाच्या अधीन राहील.

६. सदर पदोन्नत अधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे/नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून १ महिन्याच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते विहित मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहीत धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-१०८७/११३१/प्र.क्र.११/८९/बारा, दि.३०.०४.१९९१ मधील तरतूदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

७. वरील पदोन्नत अधिकारी हे नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास doesttclass1.wrd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर त्वरीत अवगत करावे.

८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०३१४१७५५२०७१२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.03.14 17:55:42 +05'30'

(सु.गं.गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि)/ सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) सर्व महासंचालक/कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग

७) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई .

८) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.

९) मुख्य अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग, नाशिक.

१०) सर्व अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), जलसंपदा विभाग.

११) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.

१२) संबंधीत अधिकारी. (कार्यालय प्रमुखामार्फत)

१३) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.

१४) सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .

१५) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.